# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


जा.क्र.मनपा/आस्था/ 454 /2025-26 दि. 09 / 05 /2025

विषय :- मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या व्यवसायासंबंधीच्या व्यवहारांवर 01 वर्षाकरीता बंदी घालण्याबाबत.

संदर्भ :-
1. जा.क्र.मनपा/आस्था/2597/2024-25, दि.12/12/2024 रोजीची नोटीस.
2. दि.13/12/2024 रोजीचा नोटीसीचा खुलासा.
3. ठेका रद्द करण्याचे आदेश जा.क्र.मनपा/आस्था/2968/2024-25, दि.28/01/2025
4. जा.क्र.मनपा/आस्था/3073/2024-25, दि.10/02/2025 रोजीची नोटीस
5. दि.14/02/2025 रोजीचा नोटीसीचा खुलासा.

## आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांतर्गत ठेका पध्दतीने 35 कनिष्ठ अभियंता (ठेका) पुरवठा करणेकरीता दि.08/11/2021 रोजी करारनामा करण्यात येऊन दि.01/12/2021 रोजीच्या आदेशान्वये मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना कार्यादेशाच्या दि.01/12/2021 रोजीपासून दि.30/11/2024 पर्यंत 03 वर्षाकरीता कार्यादेश देण्यात आलेला आहे.

दि.18/08/2022 व दि.19/10/2022 रोजीच्या आदेशान्वये 10 कनिष्ठ अभियंता (ठेका) पुरवठा करण्याबाबत दि.18/08/2022 ते दि.17/08/2023 पर्यंत 01 वर्षाकरीता आदेश देण्यात आलेला आहे. तसेच दि.18/04/2023 रोजीच्या आदेशान्वये मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना 04 कनिष्ठ अभियंता (ठेका) पुरवठा करणेकरीता कार्यादेशाच्या दि.01/12/2021 रोजी पासून दि.30/11/2024 पर्यंत कार्यादेश देण्यात आलेला होता. सदरची मुदत दि.30/11/2024 रोजी संपुष्टात येत असल्याने दि.11/12/2024 रोजी निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

**करारनाम्यातील अट क्र.27** मध्ये "कंत्राटदाराने महानगरपालिकेच्या कामकाजासाठी नेमलेल्या ठेका कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट/ठेका तात्काळ रदद करुन त्याचे नाव काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल", असे नमुद आहे. ठेका कनिष्ठ अभियंता यांचे देयक मनपा कार्यालयात सादर केल्यानंतर विहीत पध्दतीने देयक मंजूर झाल्यावर कंत्राटदार यांना धनादेशाव्दारे देयक मनपातर्फे अदा केले जाते. तथापि, कंत्राटदार यांनी कनिष्ठ अभियंतांना वेतन प्रदान केल्यानंतर कनिष्ठ अभियंता यांना कंत्राटदार यांस सुमारे रु.5,000/- रोखीने परत द्यावे लागते याबाबत ठेका कनिष्ठ अभियंता यांनी सांगितल्याचे शहर अभियंता यांनी कळविले आहे. तसेच याबाबत ठेका कनिष्ठ अभियंता यांनी दि.07/02/2025 रोजी लेखी पत्र मनपास दिलेले आहे. या मुद्दयाबाबत कंत्राटदार यांनी त्यांच्या दि.14/02/2025 रोजीच्या लेखी म्हणण्यात काहीही खुलासा सादर केलेला नाही. म्हणजेच कंत्राटदार यांनी कनिष्ठ अभियंता यांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे आढळून येत असल्याने कंत्राटदार यांनी करारनाम्यातील अट क्र.27 चा भंग केलेला आहे.

**करारनाम्यातील अट क्र.32** मध्ये "व्दितीय पक्षकारास कामाचा महिना संपताच कर्मचाऱ्यांच्या वेतनाची मागणी महानगरपालिकेस सादर करावी व व्दितीय पक्ष यांनी प्रत्येक महिन्यास कामगारांना वेळच्या वेळी किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा (प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेच्या आतमध्ये) करणे बंधनकारक राहिल", अशी तरतुद आहे. परंतु सदर तरतुदीनुसार मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी 10 तारखेच्या आत वेतन अदा केलेले नाही.

ठेका कर्मचाऱ्यांचे वेतन मुदतीत अदा करणेबाबत यापूर्वी देखील मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना वेळोवेळी लेखी नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत व मौखिक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही त्यांनी कर्मचा-यांचे वेतन 10 तारखेच्या आत अदा केलेले नाही. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | 36 कनिष्ठ अभियंता | वेतन अदा केल्याची दिनांक (देयकासोबत जोडलेल्या बँक स्टेटमेंट नुसार) | वेतन अदा करण्यास झालेला विलंब | 10 कनिष्ठ अभियंता | वेतन अदा केल्याची दिनांक (देयकासोबत जोडलेल्या बँक स्टेटमेंट नुसार) | वेतन अदा करण्यास झालेला विलंब |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | एप्रिल-2024 | 30/05/2024 | 30 दिवस | मे-2024 | 20/06/2024 | 10 दिवस |
| 2. | मे-2024 | 20/06/2024 | 10 दिवस | जुन-2024 | 19/07/2024 | 09 दिवस |
| 3. | जुन-2024 | 19/07/2024 | 09 दिवस | जुलै-2024 | 11/09/2024 | 31 दिवस |
| 4. | जुलै-2024 | 11/09/2024 | 31 दिवस | सप्टेंबर-2024 | 17/10/2024 | 07 दिवस |
| 5. | सप्टेंबर-2024 | 18/10/2024 | 08 दिवस | - | - | - |

सबब, कर्मचाऱ्यांचे वेतन 10 तारखेच्या आत अदा करीत नसल्यावरुन मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी करारनाम्यातील अट क्र.32 चा भंग केलेला आहे.

कंत्राटदार यांनी कर्मचारी यांना कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन दिल्याबाबत, करारनाम्यातील अटींचे उल्लंघन केल्याबाबत, भविष्यात मुख्य नियोक्ता (Principal Employer) म्हणून मनपास कामगार आयुक्त कार्यालय मार्फत किंवा इतर सक्षम प्राधिकरणामार्फत कायदेशिर कार्यवाहीस सामारे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कंत्राटदार यांनी **करारनाम्यातील अट क्र.27 व 32** चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. तरी या उल्लंघनाबाबत कंत्राटदार यांचेविरुध्द इतर करावयाच्या कायदेशीर कार्यवाहीचा अधिकार राखून करारनाम्यातील अट क्र.27 नुसार त्यांचे समवेत केलेला दि.08/11/2021 चा करारनामा रद्द करण्यात येऊन त्यांचा ठेका रद्द करुन दि.29/01/2025 पासून ठेका कनिष्ठ अभियंत्यांचा पुरवठा मनपास करण्यात येऊ नये याबाबत दि.28/01/2025 रोजीच्या आदेशान्वये कंत्राटदार यांना कळविण्यात आले आहे.

करारनाम्यातील अट क्र.27 मधील तरतुदी तसेच शासन निर्णय क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दि.01 डिसेंबर, 2016 मधील तरतुदीनुसार कंत्राटदार यांना महानगरपालिकेच्या व्यवसायासंबंधीच्या व्यवहारांवर 01 वर्षाकरीता बंदी का घालण्यात येऊ नये? याबाबत कंत्राटदार यांना दि.10/02/2025 रोजीच्या नोटीसी अन्वये खुलासा सादर करणेबाबत कळविले असता कंत्राटदार यांनी दि.14/02/2025 रोजी खुलासा सादर केलेला आहे. कंत्राटदार यांनी सदर खुलाश्यामधील उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मुद्देनिहाय प्रशासनाचे मत सादर करण्यात येत आहे :-

अ] यापूर्वी कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन 10 तारखेपूर्वी न होण्याची कंत्राटदार यांनी सादर केलेली कारणे पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | कंत्राटदार यांनी नोटीसीच्या खुलाशामध्ये उपस्थित केलेले मुद्दे | प्रशासनाचे मत |
|---|---|---|
| 1. | आपल्या कार्यालयाकडून ठेका कर्मचारी यांचा दरमहा हजेरीपट मिळण्यासाठी 14 ते 17 तारखेपर्यंत उशीर होत आहे. आज रोजी सुद्धा सही अभावी काही हजेरीपट संस्थेस उपलब्ध | महानगरपालिकेकडून कंत्राटदार यांनी हजेरीपत्रक उपलब्ध करून घेतले आहे. तथापी, करारनाम्यातील अट क्र.32 नुसार सदरचे वेतन प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपूर्वी अदा केलेले |

| | | |
|---|---|---|
| | झालेले नाहीत. त्यानंतर यांचे EPFO य ESIC भरण्याची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी 15 ते 20 तारीख पर्यंत संस्थेस विलंब होत असतो, त्यामुळे तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच संस्थेकडून सदर ठेका कर्मचारी याचे वेतन करण्यात येते, पर्यायाने आपल्या कार्यालाकडून संस्थेस निधी मिळण्यास आपल्या कार्यालयाकडून वारंवार उशीर होत असतो, | नाही. तसेच करारनाम्यातील अट क्र.12 नुसार कंत्राटदार यांना Reimbursement स्वरुपात देयक अदा करणेत आलेले आहे. कंत्राटदार यांनी ठेका कनिष्ठ अभियंता यांचेकडून स्वत: हजेरीपत्रक उपलब्ध करून घेतले आहे, सबब हजेरीपत्रक उशिरा प्राप्त होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तसेच देयक सादर करतेवेळी कंत्राटदार यांनी हजेरीपत्रकाची प्रत सोबत जोडूनच देयक सादर केले आहे. |
| 2. | संस्थेस देयक मिळाल्यानंतर निधी त्याच महिण्यात अथवा 15 दिवस उशिराने का होईना परंतु देयकाची पूर्ण रक्कम उपलब्ध झाल्यास संस्थेस वेळेवर वेतन करणे शक्य होईल, त्यामुळे संस्थेची आर्थिक पिळवणूक होत आहे. त्यामुळे संस्थेने अट क्र.32 चे उल्लंघन हेतुपुरस्कर केलेले नाही. | करारनाम्यातील अट क्र.12 मध्ये "कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या वेतनाच्या/ RTGS/NEFT रक्कम/इतर भत्त्यांची रक्कम कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बँक अधिकाऱ्यांच्या सहीचे विवरणपत्र (Statement) आणि कंत्राटी कामगारांचे स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर संबंधीत कंत्राटी कामगारांचा धनादेश क्रमांक/ECS क्रमांक/NEFT क्रमांक लिहिलेला असेल), कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयास सादर करावे. त्यानंतर त्याचे Reimbursement स्वरुपात देयक अदा करणेत येईल" असे नमुद आहे. सदर अटीनुसार कंत्राटदार यांनी प्रथम कर्मचारी यांचे मागील महीन्याचे वेतन अदा करुन तद्नंतर सदर बाबत Reimbursement स्वरुपात देयकाची मागणी करणे अपेक्षित आहे. कंत्राटदार यांचेकडून सादर करण्यात करण्यात आलेल्या देयकाच्या अनुषंगाने कर्मचा-यांचे PF/ESIC व Salary Slip बद्दल अपूर्ण माहिती दिली. त्यामुळे कागदपत्रे तपासणी करिता कालावधी लागला व पडताळणी झाल्यानंतर देयक अदा केले. त्यामुळे महानगरपालिकेकडून कंत्राटदार यांना देयकाची रक्कम अदा करणेस उशिर झाला हे म्हणणे चुकीचे आहे. Reimbursement स्वरुपात देयकाची मागणी कंत्राटदार यांचेकडूनच वेळोवेळी उशिराने केलेली आहे.<br>करारनाम्यातील अट क्र.32 मध्ये "व्दितीय पक्षकारास कामाचा महिना संपताच कर्मचाऱ्यांच्या वेतनाची मागणी महानगरपालिकेस सादर करावी व द्वितीय पक्ष यांनी प्रत्येक महिन्यास कामगारांना वेळच्या वेळी किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा (प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेच्या आतमध्ये) करणे बंधनकारक राहील" असे नमुद आहे. तथापी, कंत्राटदार यांनी प्रत्येक वेळी वेतन महिन्याच्या 10 तारखेपूर्वी अदा केलेले नाही. |

| | | |
|---|---|---|
| 3. | यापूर्वी आपल्या कार्यालयाकडून One Click Attendance (Biometric Attendance) या संदर्भात कुठलीही पूर्वसूचना अथवा पत्र संस्थेस दिलेले नाही. संस्थेने आपल्या विभागीय कार्यालयाच्या उपस्थिती अहवालानुसारच देयक सादर केलेले होते व त्या अनुषंगाने आपण देयकाची रक्कम अदा केलेली आहे. परंतु आपल्या देयकातून One Click Attendance (Biometric Attendance) च्या हजेरीपाटानुसार आपल्या देयकातून रक्कम कपात करण्यात येईल अश्या सूचना मा.उपआयुक्त सो., यांनी घेतलेल्या दि.14/10/2024 च्या मिटिंग मध्ये देण्यात आलेल्या होत्या. परंतु संस्थेस आजपर्यंत कुठल्याही प्रकारचा One Click Attendance (Biometric Attendance) अहवाल प्राप्त झालेला नाही. यामध्ये संस्थेची कुठलीही चूक दिसून येत नाही. त्यामुळे संस्था फक्त वेतन करा अन्यथा कार्यवाही करू अश्या भितीपोटी कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन करून मोठ्या आर्थिक संकटात सापडण्याची दाट शक्यता होती त्यामुळे संस्थेने ठेका कनिष्ठ अभियंता यांचे वेतन केलेले नाही. | ठेका कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांचे वेतन अगोदर हजेरीपत्रकानुसार अदा करण्यात येत होते. त्यानंतर हजेरीमध्ये सुसुत्रता येण्याच्या दृष्टीने माहे जुन 2024 मध्ये One Click Attendance चालु करण्यात आले. मनपाच्या अखत्यारीत असलेल्या संबंधित सर्व विभागांमध्ये One Click Attendance नुसार वेतन अदा करण्यास मनपाने सुरु केले आहे, याबाबत सर्व कंत्राटदार/कर्मचारी यांना अवगत करण्यात आलेले आहे. ठेका कनिष्ठ अभियंता यांची One Click Attendance मध्ये 100% हजेरी दिसून येत नव्हती व त्यामुळे कंत्राटदार यांना माहे जुलै-2024, ऑगस्ट-2024 व सप्टेंबर-2024 या महिन्यांचे देयकाची 20% रक्कम अदा करण्यात आलेली नाही.<br>कंत्राटदार यांना वारंवार कळवून देखीलही त्यांनी ठेका कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांना मुदतीत वेतन अदा न केल्यामुळे किमान वेतन कायदा 1948 व कंत्राटी कामगार कायदा 1970 मधील तरतुदी अन्वये ठेका कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांचे माहे नोव्हेंबर-2024, डिसेंबर-2024 व जानेवारी-2025 चे वेतन थेट बँक खात्यावर महानगरपालिकेकडून अदा करणेकरीता सदरच्या वेतनाप्रती कंत्राटदार यांना द्यावयाची देयकाची रक्कम रोखून ठेवण्यात आलेली आहे. |

ब] यापूर्वी महानगरपालिका कार्यालयाकडे थकीत असलेली रक्कमेचा कंत्राटदार यांनी सादर केलेला तपशील पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | कंत्राटदार यांनी नोटीसीच्या खुलाशामध्ये उपस्थित केलेले मुद्दे | प्रशासनाचे मत |
|---|---|---|
| 1 | मा.उपआयुक्त सो., यांनी घेतलेल्या दि.14/10/2024 च्या मिटिंग मध्ये मा.उपआयुक्त सो., यांनी 72 तासाचे आत बोनस व इतर प्रलंबित देयकाची रक्कम आपणास अदा करण्यात येईल तसेच सदर देयकाची रक्कम अदा न झाल्यास आपण आमचे कार्यालयास लेखी तक्रार देवू शकता असे सांगण्यात आले होते, सदर मिटिंगमध्ये झालेली चर्चा व सांगण्यावरून आम्ही आपणास वेतन व बोनस अदा करून देयके सादर केलेले आहेत. तशी तक्रार देखील आपल्या कार्यालयात यापूर्वी सादर केलेली आहे. परंतु अद्यापही अजूनही देयकाची रक्कम संस्थेस अदा झालेली नाही. | दि.14/10/2024 रोजी मा.आयुक्त महोदय यांचे दालन, मुख्यालय येथे दिवाळी सणानिमित्त कंत्राटी कर्मचा-यांचे सानुग्रह अनुदान व माहे सप्टेंबर-2024 चे वेतनाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. दिवाळी सण असल्यामुळे देयकाची कुठलीही तपासणी न करता माहे जुलै-2024, ऑगस्ट-2024 व सप्टेंबर-2024 या महिन्यांचे देयकाची 80% रक्कम कंत्राटदार यांना अदा करण्यात आलेली आहे. ठेका कनिष्ठ अभियंता यांची One Click Attendance मध्ये 100% हजेरी दिसून येत नव्हती व त्यामुळे कंत्राटदार यांना माहे जुलै-2024, ऑगस्ट-2024 व सप्टेंबर-2024 या महिन्यांचे देयकाची 20% रक्कम |

| | | |
|---|---|---|
| | | अदा करण्यात आलेली नाही. सदर 20% रक्कम अदा करणेकरिता पडताळणी सुरु आहे. कंत्राटदार यांना वारंवार कळवून देखीलही त्यांनी ठेका कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांना मुदतीत वेतन अदा न केल्यामुळे किमान वेतन कायदा 1948 व कंत्राटी कामगार कायदा 1970 मधील तरतुदी अन्वये ठेका कनिष्ठ अभियंता कर्मचारी यांचे माहे नोव्हेंबर-2024, डिसेंबर-2024 व जानेवारी-2025 चे वेतन थेट बँक खात्यावर महानगरपालिकेकडून अदा करणेकरीता सदरच्या वेतनाप्रती कंत्राटदार यांना द्यावयाची देयकाची रक्कम रोखून ठेवण्यात आलेली आहे. बोनसची. थकीत रक्कम दि.14/01/2025 रोजी कंत्राटदार यांना ICICI BANK, धनादेश क्रमांक - 157081 अन्वये अदा करण्यात आलेली आहे. |

महानगरपालिकेकडून कंत्राटदार यांना माहे सप्टेंबर 2023 व डिसेंबर 2024 मध्ये 02 वेळा मुदतवाढ देण्यात आलेबाबत कंत्राटदार यांनी खुलाश्यात नमुद केले आहे.

**करारनामा दि.08/11/2021 (03 वर्षाचा कालावधी)**

| अ. क्र. | कार्यादेश | कनिष्ठ अभियंता पुरवठा संख्या | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | प्रथम कार्यादेश दि.01/12/2021 | 35 | दि.01/12/2021 ते दि.30/11/2024 |
| 2 | द्वितीय कार्यादेश दि.19/10/2022 | 10 | दि.18/08/2022 ते दि.17/08/2023<br>दि.21/08/2023 ते दि.30/11/2024 (मुदतवाढ) |
| 3 | तृतीय कार्यादेश दि.18/04/2023 | 04 | दि.01/12/2021 ते दि.30/11/2024 |

कंत्राटाची मुदत दि.30/11/2024 रोजी संपुष्टात येत असल्याने नविन निविदा प्रक्रिया चालु केल्याने नविन ठेकेदार नियुक्त होणेस अवधी लागणार असल्याने नविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीकरिता मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांच्या करारनाम्यास उक्त तक्त्यातील अनु.क्र.02 मध्ये नमुद केल्यानुसार एकदाच मुदतवाढ देण्यात आलेली आहे. 10 कनिष्ठ अभियंता पुरवठा करणेबाबतचा कालावधी वाढविण्यात आला असून सदरची वाढ मुळ करारनामा दि.08/11/2021 अंतर्गतच देण्यात आलेली आहे.

**निष्कर्ष:-**

कंत्राटदार यांनी कनिष्ठ अभियंतांना वेतन प्रदान केल्यानंतर कनिष्ठ अभियंता यांना कंत्राटदार यांस सुमारे रु.5,000/- रोखीने परत द्यावे लागते ही बाब कनिष्ठ अभियंता यांची आर्थिक पिळवणूक करणारी आहे.

कंत्राटदार यांनी, महानगरपालिकेच्या कामकाजासाठी नेमलेल्या ठेका कनिष्ठ अभियंता यांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले असल्याने त्यांनी किमान वेतन कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे.

तसेच प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेच्या आतमध्ये वेतन अदा न केल्याने मुदतीत वेतन अदा केलेले नसल्याचे सिध्द होत आहे.

यावरुन कंत्राटदार यांनी करारनामा अधिकाराचा गैरवापर केल्याचे दिसून येत आहे.

**तरी वरील नमुद वस्तुस्थितीला व लेखी म्हणणे व कागदपत्रांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :-**

**"आदेश"**

वरीलप्रमाणे सबबी वरुन कंत्राटदार मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांनी त्यांच्या जबाबदारीत टाळाटाळ केल्याचे दिसून येत आहे. सबब कंत्राटदार मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांना दि.10/02/2025 रोजी दिलेल्या नोटीसीनुसार त्यांनी सादर केलेला दि.14/02/2025 रोजीचा खुलासा अमान्य करणेत येत आहे. तसेच करारनाम्यातील अट क्र.27 नुसार शासन निर्णय क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दि.01 डिसेंबर, 2016 अन्वये कंत्राटदार मे.देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांचेवर या आदेशाच्या तारखेपासून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या व्यवसायासंबंधीच्या व्यवहारांवर 01 वर्षाकरीता बंदी घालण्यात येत आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

प्रति,
मे. देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित,
न्यु प्लॉट, नियर प्रायमरी स्कुल,
सटाना, ता.सटाना, जि. नाशिक,
पिन कोड - 423301

प्रत माहितीस्तव :-

1. मा.आयुक्त महोदय
2. मा.अतिरिक्त आयुकत (1) व (2)
3. उप-आयुक्त (सर्व)
4. सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख
5. संगणक विभाग (संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता)
6. निवडनस्ती